# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०४ मार्च, २०२५ / फाल्गुन १३, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

---

### उरण (जि.रायगड) येथे तरुणीवर अत्याचार करुन हत्या केल्याबाबत

**(१) * १४४० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.रविशेठ पाटील (पेण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण (जि.रायगड) येथील तरुणीवर लैगिंक अत्याचार करुन तिची दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास हत्या करण्यात आली असून, याप्रकरणी अद्यापपर्यंत आरोपीला अटक केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(३) तसेच रायगड जिल्ह्यात सन २०२४ मध्ये बलात्काराची १०७ प्रकरणे, विनयभंगाची १५७ प्रकरणे दाखल झाली असून पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या हद्दीतील २८ पोलीस ठाण्यांपैकी २४ पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचार प्रकरणी गुन्हे दाखल आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच या भागातील महिलांवरील होणाऱ्या अत्याचारांच्या घटना रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) रायगड जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक कार्यालयांतर्गत माहे जानेवारी २०२५ मध्ये महिलांवरील अत्याचाराचे एकूण २२ गुन्हे दाखल आहेत. तसेच रायगड जिल्ह्यातील नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत महिलांवरील अत्याचाराचे एकूण २६ गुन्हे दाखल आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे,

सदर प्रकरणी उरण पोलीस ठाणे येथे ग.र.क्र.३००/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३ (१) सह अनुसुचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ सुधारणा अधिनियम २०१५ चे कलम ३(२) (ट) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ अन्वये दि.२७.०७.२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीस अटक आहे.
(३) हे अंशत: खरे आहे,

रायगड जिल्ह्यातील नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०२४ मध्ये महिलांवर बलात्काराचे ८६ गुन्हे, विनयभंगाचे १०६ गुन्हे दाखल आहेत.

तसेच रायगड जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक कार्यालयांतर्गत सन २०२४ मध्ये महिलांवरील बलात्काराचे ३१ गुन्हे व विनयभंगाचे ११७ गुन्हे दाखल असून, २८ पोलीस ठाण्यांपैकी २६ पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलींवर विनयभंगाचे ४० गुन्हे व बलात्काराचे ७६ गुन्हे दाखल आहेत.
(४) सदर संपुर्ण गुन्ह्यांबाबत केलेली कारवाई खालीलप्रमाणे आहे :-

| कार्यालय | गुन्ह्याचा प्रकार | एकुण गुन्हे | दोषारोपपत्र दाखल | तपास सुरु |
|---|---|---|---|---|
| रायगड जिल्हाअंतर्गत नवी मुंबई पोलीस आयुक्तालय | बलात्कार | ८६ | ८४ | ०२ |
| | विनयभंग | १०६ | ९० | १६ |
| पोलीस अधिक्षक कार्यालय, रायगड. | बलात्कार | १०७ | १०७ | ०० |
| | विनयभंग | १५७ | १५१ | ०६ |

(५) रायगड जिल्ह्यातील महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होऊ नये तसेच सदर गुन्ह्यांना आळा घालण्याकरिता शाळा, कॉलेज, बाजारपेठा, सार्वजनिक व महत्वाच्या ठिकाणी दररोज सतर्कतेने पेट्रोलिंग करण्यात येते. पोलीस ठाणे स्तरावर महिलांमध्ये जनजागृती होणेकरिता कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. तसेच महिला अधिकारी यांचेमार्फत प्रत्येक गाव भेटी दरम्यान ग्रामपंचायत व इतर स्थानिक प्रशासकीय कार्यालयांमध्ये महिला अत्याचाराविषयी बैठका आयोजित करण्यात येतात. पोलीस ठाणेत महिलांच्या समस्या व अडचणी जाणून घेण्यासाठी महिला सहाय्यता कक्षाची स्थापना करण्यात येऊन त्यामध्ये महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नेमणूक करण्यात येते. तसेच निर्भया पथकामार्फत पेट्रोलिंग करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यात तसेच मुंबईतील नागरिकांची विविध प्रकरणांत सायबर फसवणूक झाल्याबाबत**

**(२) * ८५ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र विशेषत: मुंबई, ठाणे, नागपूर व पुणे या शहरांमध्ये नागरिकांची कोटयवधी रुपयांची सायबर फसवणूक झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२३ मध्ये तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी राज्यात सायबर गुन्हे रोखण्यासाठी ४३ सायबर लॅब उघडण्याचे तथा प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्याचे आश्वासन देऊनही त्याची प्रभावी अंमलबजावणी अजूनही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अत्याधुनिक न्यायवैदयक प्रयोगशाळांची कमतरता तसेच अशा प्रयोगशाळेच्या चाचण्या संथगतीने होत असल्याने सायबर गुन्ह्यांच्या तपासाला विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाढत्या गुन्ह्यांना आळा बसविण्यासाठी शासनाने सायबर फसवणूकीविरोधात विमा संरक्षण देण्याबाबतची मागणी राज्य वा केंद्र शासनाकडे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची चौकशी करुन सायबर फसवणूकीच्या प्रकरणांचा तपास जलद गतीने होण्यासाठी तसेच भविष्यात अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी शासनाकडून कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०२४ मध्ये राज्यासह मुंबई, ठाणे, नागपूर व पुणे या शहरांमधील सायबर फसवणूकीबाबतची सांख्यिकी माहिती खालील प्रमाणे आहे :-

| | **दाखल गुन्हे** | **अटक आरोपी** | **फसवणूक झालेली रक्कम (रुपये मध्ये)** |
|---|---|---|---|
| मुंबई शहर | ४८४९ | ७५७ | ८,८८,२९,२३,०९५ |
| ठाणे शहर | ६८० | १३ | १,७४,०४,३६,००६ |
| नागपूर शहर | २१२ | ०५ | ६३,८५,०९,५०१ |
| पुणे शहर | १५०४ | ०९ | ६०,०७,९३,०४,३९८ |
| राज्यात एकुण | ८९७४ | १००७ | ७६,३४,२५,४६,५०८ |

(२) राज्यातील जिल्हा / आयुक्तालय स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या ४३ सायबर लॅब / तंत्रज्ञान युक्त गुन्हे अन्वेषण केद्रांना शासन अधिसुचना क्रमांक. पीओएस-३६१६/प्र.क्र.१२२/पोल३ दिनांक १५ नोव्हेंबर २०१६ अन्वये सायबर पोलीस ठाणे म्हणून घोषित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत राज्यात एकूण ५० सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित करण्यात आले आहेत व त्यामध्ये प्रशिक्षित कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) गुन्ह्यांच्या दृष्टीने फॉरेन्सिक विश्लेषणासाठी अत्याधुनिक असे “Centre of Excellence in Digital Forensic” हे प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा पुणे येथे सुरु करण्यात आलेले आहे. तसेच संगणक गुन्हे विभागातील प्रलंबित प्रकरणे जलदगतीने विश्लेषण करण्यासाठी Semi-Automated Processing प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार आहे. तसेच न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या अधिपत्याखालील मुंबई, नागपूर, पुणे, छ. संभाजीनगर, नाशिक, अमरावती, कोल्हापूर व नांदेड या प्रयोगशाळामध्ये अत्याधुनिक संगणक गुन्हे विभाग कार्यरत आहेत.

(४) वाढत्या गुन्ह्यांना आळा बसविण्यासाठी शासनाने सायबर फसवणूकीविरोधात विमा संरक्षण देण्याबाबत सद्यस्थितीत कार्यवाही/ प्रक्रिया सुरू नाही.

(५) सायबर फसवणूकीच्या प्रकरणांचा तपास जलद गतीने होण्यासाठी तसेच भविष्यात अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी शासनाकडून ठोस उपाययोजना करण्याकरीता महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प हा जागतिक स्तरावरील एक अत्याधुनिक आणि क्रांतिकारी उपक्रम नवी मुंबई, महापे येथील सायबर मुख्यालयात चालू करण्यात आला आहे. राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी येथे नोडल सायबर पोलीस स्टेशनसह सहा प्रमुख विभाग कार्यरत असतील. महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प Go Live च्या अंतिम टप्प्यात असून, लवकरच हा प्रकल्प संपूर्णपणे कार्यान्वित होणार आहे. सदर प्रकल्प राज्यातील सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्हे नियंत्रणासाठी हा एक अत्याधुनिक केंद्रबिंदू ठरेल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थीनींवरील अत्याचाराच्या घटनांत वाढ झाल्याबाबत

**(३) * १९१८ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्रीमती श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक ठिकाणच्या शाळांमध्ये विद्यार्थीनींवर होणारे अत्याचार, विनयभंग, बलात्कारांची प्रकरणे समोर आल्यानंतर याची गंभीर दखल घेऊन सर्व शासकीय, निमशासकीय, महानगरपालिका व खाजगी शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसविण्याचे तसेच शाळेत विशाखा समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनेक शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आले नाहीत, काही ठिकाणी ते बंद असणे वा बंद करुन ठेवणे, डेटा सुरक्षित न ठेवणे वा त्यात छेडछाड करणे असे अनेक प्रकार घडत असल्याचे देखील निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनेक शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. व विशाखा समितीच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने अशा प्रकारच्या अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशी प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी विशेष न्यायालय व विशेष समुदेशन केंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे व यामध्ये दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) विधि व न्याय विभागाच्या दिनांक ०९ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये "National Mission for Safety of Women" अंतर्गत महिलांवरील बलात्काराची व POCSO कायद्यांतर्गत बालकांवरील अत्याचाराची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्थापन राज्यातील १३८ विशेष जलदगती न्यायालयांकरीता पदनिर्मिती करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंबंधी अनुचित घटना घडल्यास त्यांना धीर देऊन त्यांचे मनोबल व स्वास्थ्य वाढविण्याकरिता इच्छुक स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. २७ सप्टेंबर,२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर व सांगली जिल्हयातील पंचगंगा व वारणा नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत

**(४) * १५२७ श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर) (शिरोळ), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीत सभोवतालच्या अनेक औद्योगिक वसाहतीतील रसायनमिश्रीत सांडपाणी तसेच वस्त्रोद्योग व्यवसायाशी निगडीत प्रोसेसिंग युनिट चे पाणी कोणतीही प्रक्रिया न करता सोडल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदुषण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच भादोले, दानोळी (जि.कोल्हापूर) व चिकुर्डे (जि.सांगली) येथील वारणा नदीमध्ये कारखान्यातून सोडण्यात येणारे मळीयुक्त पाणी मिश्रीत झाल्याने प्रदुषित प्राण्यांवर नागरिक, मासे व इतर जलचर प्राण्यांवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी नदीत प्रदुषित पाणी सोडल्याने नदीकाठावर सर्वत्र मळी व मृत माशांमुळे दुर्गंधी पसरली असून त्याठिकाणच्या अनेक गावांना नदीतून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त नदी काठावरील गावातील नागरिकांचे आरोग्य, नदीतील जलचर प्राण्यांचे जीव वाचवणे व नदी प्रदुषण होऊ नये यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.पर्यावरण मंत्री महोदयांना दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनावर शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) असल्यास, पंचगंगा तसेच वारणा नदी प्रदुषणमुक्त करण्याकरिता नवीन आराखडा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नदीमध्ये कोणत्याही प्रकारचे औद्योगिक सांडपाणी सोडण्याची परवानगी देण्यात येत नाही. तथापि, नदीलगत असलेल्या गावातील सांडपाणी काही प्रमाणात नदीमध्ये मिसळल्याचे निदर्शनास येते.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

(४) प्रश्नाधीन विषयाबाबतचे मा.लोकप्रतिनिधीं यांचे निवेदन शासनास प्राप्त झाले असून त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) व (६) भादोले, दानोळी जि. कोल्हापूर व चिकुर्डे जि. सांगली येथील मासे मतृकीच्या घटनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रणामार्फत दि.०९/१२/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने मे.वारणा सहकारी साखर कारखान्यास जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ कलम ३३ (अ) अंतर्गत निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर सदर उद्योगास दि.१४/०१/२०२५ रोजी अंतरिम आदेश देऊन रूपये पाच (५) लक्ष रूपयांची बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

सद्यस्थितीमध्ये कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये दुधाळी येथे ६ द.ल.लि. प्रतिदिन इतक्या सांडपाण्यावर तसेच इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये एकूण निर्माण होणाऱ्या ४० द.ल.लि. प्रतिदिन पैकी २० द.ल.लि. प्रतिदिन इतक्या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. याव्यतिरिक्त सद्यस्थितीमध्ये १८ द.ल.लि. प्रतिदिन इतक्या क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे काम अंतीम टप्यात आहे.

पंचगंगा नदी प्रदूषणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल जनहित याचिका क्र. १८३/२०१२ मध्ये मा. न्यायालयाने माहे नाव्हेंबर, २०१४ मध्ये दिलेल्या अंतरीम आदेशांनुसार विभागीय आयुक्त, पुणे व जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात येतात. व याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा त्रैमासिक अहवाल मा. विभागीय आयुक्त, पुणे यांच्या मार्फत मा. उच्च न्यायालयास सादर करण्यात येतो.

पंचगंगा नदी प्रदूषणाच्या अनुषंगाने मा. हरीत लवाद, पुणे यांचेकडे दाखल मूळ अर्ज क्र. ५६३/२०२२ या प्रकरणी मा.लवादाने दिलेल्या आदेशांनुसार मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२/११/२०२४ रोजी बैठक पार पडली असून सदर बैठकीमध्ये पंचगंगा नदी प्रदूषण नियंत्रणाबाबत आवश्यक उपाययोजना करणेबाबतच्या सूचना सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. तसेच सदर बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशांनुसार पंचगंगा नदी क्षेत्रामध्ये होणाऱ्या मासे मर्तुकीच्या घटनांची चौकशी करणे व त्याची कारणमीमांसा शोधणे याकरिता दि.०२/१२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

-----------------

**चंद्रपूर येथे महाऔष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पातून निघणाऱ्या धुळीमुळे प्रदुषणात वाढ झाल्याबाबत**

**(५) * ८५२ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा ऊर्जानगर, कोंडी व नेरी (जि.चंद्रपूर) येथील वेकोलि दुर्गापूर सीएचपी बंकर, सीएचपी रोप-वे व महाऔष्णीक विद्युत केंद्र प्रकल्पातून २४ तास निघणाऱ्या धुळीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात वायुप्रदुषण होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदुषणामुळे नागरिकांना श्वसनाच्या व त्वचेच्या होणाऱ्या विकारांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून, ही प्रदुषणकारी उपकरणे हटविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रदूषण रोखण्याबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे. मा.श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी दि.०२/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना लेखी निवेदन दिले आहे.

(३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दि. १७/०१/२०२५ रोजी चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र व वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेडच्या मे. दुर्गापुर खुली खाण या उद्योगांची पाहणी करण्यात आली. भेटी दरम्यान आढळुन आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधित उद्योगांवर नियामाप्रमाणे आवश्यक कारवाई करण्यात आली आहे. चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र या उद्योगास दि.१७/०१/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली व त्या अनुषंगाने सदर उद्योगाने दि.३०/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अनुपालन अहवाल सादर केला आहे.तसेच, वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड दुर्गापुर या उद्योगास दि.२९/०१/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली व त्या अनुषंगाने सदर उद्योगाने दि.०७/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अनुपालन अहवाल सादर केला आहे.तसेच उपरोक्त दोन्ही उद्योगांची अनुक्रमे रू.१५.०० लक्ष व रू.५.०० लक्ष बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील नवीन शासकीय वसतीगृहातील इतर मागास प्रवर्ग, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुदान देण्याबाबत**

**(६) * ४६९ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागास प्रवर्ग, भटक्या जमाती तसेच विशेष मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांकरीता शासनाने ५२ नवीन शासकीय वसतीगृहे सुरु केली असून, त्यात जवळजवळ ५ हजार २०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा वसतीगृहातील विद्यार्थ्यांना शासनाकडून मासिक निर्वाह भत्ता व भोजन भत्ता तसेच शैक्षणिक साहित्यांकरीता दरमहा अनुदान देण्याचा निर्णय घेतला असून, मागील ४ ते ५ महिन्यांपासून विद्यार्थ्यांना हा निर्वाह व भोजन भत्ता देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच या वसतीगृहात कार्यरत असलेले गृहपाल, लिपिक व शिपाई या कर्मचाऱ्यांना देखील मागील ६ महिन्यांपासून वेतन अदा करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भत्त्याअभावी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची गैरसोय व आर्थिक नुकसान होत असून विद्यार्थ्यांवर उपासमारीची पाळी येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन विद्यार्थ्यांना देण्यात येणारा मासिक निर्वाह व भोजन भत्ता यासह कर्मचाऱ्यांचे वेतन तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१), (२), (३) व (४) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत कार्यान्वीत मुलां/मुलींच्या ५४ वसतिगृहामध्ये आतापर्यंत एकूण २८४२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन भत्ता, निर्वाह भत्ता तसेच मुलींना स्वच्छता साधने इ.करीता रुपये ७,१०,४८,९००/- (रुपये सात कोटी दहा लाख अठ्ठेचाळीस हजार नऊशे फक्त) इतका निधी क्षेत्रीय कार्यालयास वितरीत करण्यात आला आहे.

वसतिगृहांकरीता बाह्य यंत्रणेद्वारे नियुक्त कर्मचारी वर्गाचे वेतन देयके भागविण्यासाठी आतापर्यंत रु.३,८५,००,०००/- (रुपये तीन कोटी पंच्याऐंशी लाख फक्त) इतका निधी क्षेत्रीय कार्यालयास वितरीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाडा व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील राज्य विद्युत वितरण कंपनीतील अनियमिततेसंदर्भात चौकशी करण्याबाबत

**(७) * १५३६ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.ठाणे) तालुक्यातील राज्य विद्युत वितरण कंपनीतील उप कार्यकारी अभियंता, श्री.अविनाश कट्टकवार यांचेविरुद्ध तालुक्यात अनेक खोट्या धाडी टाकणे, चुकीचे रिडींग घेणे, रिडींगबाबत कोणतीही शहानिशा न करणे, वाढीव देयके काढणे, ग्राहकांवर खोट्या केसेस टाकणे, अरेरावी करणे, कार्यालयात वेळेवर उपस्थित न राहणे, लोकप्रतिनिधींशी उद्धटपणे वागणे व कंत्राटदारांशी अर्थपुर्ण संगनमत साधणे अशा अनेक बाबी नुकत्याच निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच ता.शहापूर, जि.ठाणे राज्य विद्युत कंपनीतील उपकार्यकारी अभियंता, श्री.प्रकाश मालखेडे आणि सहायक लेखापाल, श्री.आदित्य जोशी यांचेविरुद्ध देखील अशाच प्रकारच्या अनेक बाबी नुकत्याच निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही अधिकाऱ्यांविरुद्ध अनेक तक्रारी प्राप्त होऊनही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) काही लोकप्रतिनिधींकडून अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) श्री.अविनाश कटृकवार, उप कार्यकारी अभियंता यांच्या विरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महावितरण वसई मंडळामार्फत कार्यकारी अभियंता, वसई विभाग यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन करुन चौकशीचे कामकाज सुरु करण्यात आलेले आहे. चौकशी अहवाल दि.१५.०३.२०२५ पर्यंत सादर करणेबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

(४) त्रिसदस्यीय चौकशी समितीने अहवाल सादर केल्यानंतर त्यातील निष्कर्ष विचारात घेऊन महावितरण कंपनीच्या सेवा विनियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या झालेल्या दूरवस्थेमुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय**

**(८) * ७६१ श्रीमती मंजुळा गावित (साक्री), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्रीमती श्रीजया चव्हाण (भोकर), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अबू आझमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.प्राविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी राज्य परिवहन मंडळाच्या माध्यमातून पुरविण्यात येणाऱ्या एस.टी. बसेसच्या असुविधेमुळे नागरिक, वृद्ध, विद्यार्थी तसेच महिला इत्यादी अनेकांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आवश्यक क्षमतेपेक्षा कमी बसेस उपलब्ध असणे, बसेसची दुरवस्था झालेली असणे तसेच कालबाह्य झालेल्या नादुरुस्त बसेस यामुळे वाढत असलेले अपघाताचे प्रमाण, बसेसच्या कमतरतेमुळे दैनंदिन फेऱ्या कमी होणे, गाड्याच्या देखभाली व दुरुस्तीकरीता स्थायी व्यवस्था असतानाही ती योग्य तऱ्हेने कार्यान्वित नसणे तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या आगाराची दुरवस्था होणे इत्यादी अनेक कारणांमुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १२ लाख कि.मी. पेक्षा जास्त फिरलेल्या बसेसना परिवहन विभागाचे पासिंग नसतांना त्या रस्त्यावर चालविणे, बसेस रस्त्यात नादुरुस्त व बंद पडणे वा त्यांचे अपघात होणे अशा घटनांमुळे प्रवाशांना नाहक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसबाबत नागरिक व लोकप्रतिनिधी यांचेकडून शासनाकडे वारंवार निवेदन वा तक्रार करुनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबतची चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) रा.प.च्या उपलब्ध वाहनाच्या माध्यमातून प्रवाशांना सेवा देण्यात येतात. वाहने उत्तम राहावी यासाठी विविध कार्यशाळांमध्ये विविध प्रकारची देखभाल केली जाते. यामध्ये दैनंदिन देखभाल, दशदिनी देखभाल व डेपो डॉकिंग आगार कार्यशाळेत केले जाते.

सध्या राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात नव्याने येणारे बसेस टप्प्याटप्प्याने दाखल होत आहे.

नागरिक वृद्ध, विद्यार्थी, महिला व इतर प्रवाशांचे गैरसोय होणार नाही, याची दखल घेण्याबाबत सर्व विभांगाना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

रा.प. महामंडळाच्या दुरवस्था झालेल्या आगार व बसस्थानकांची नुतनीकरण/पुनर्बांधणी करण्याची कामे टप्प्या टप्प्याने करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) रा.प. महामंडळातर्फे वाहनांचे १५ वर्षे आयुर्मान होण्याआधीच वाहने मोडीत काढण्यात येतात. रा.प. महामंडळातील वाहने आयुर्मान पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत कशी राहतील याबाबत वाहनांच्या नियतकालिक देखभालीचे नियोजन करण्यात येते
(४) व (५) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## नाशिकच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात अज्ञात महिलेकडून नवजात बालकाची झालेली चोरी

**(९) * १६५१ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकच्या जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातून एका अज्ञात महिलेने पाच दिवसांच्या बाळाची चोरी केल्याची घटना दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने शासनाने संबंधित व्यक्तीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.क्र.०६/२०२५, बी.एन.एस.कलम १३७(२) अन्वये दि.०४/०१/२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर घटनेतील आरोपी महिलेला अटक करुन मा.न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. तथापि, मा.न्यायालयाने आरोपी महिलेस जामिन मंजूर केला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरीच्या समुद्रात गस्तीनौकेतील अधिकाऱ्यांवर परप्रांतीयांच्या हायस्पीड बोटीतील खलाशांनी केलेला हल्ला

**(१०) * १५७० श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरीच्या समुद्रात गोळप-पावसच्या दिशेने अवैध हायस्पीड ट्रॉलरचा पाठलाग करीत असतांना गस्तीनौकेतील अधिकाऱ्यांवर रात्री साडेअकराच्या सुमारास परप्रांतीयांच्या ३५ ते ४० हायस्पीड बोटीतील खलाशांनी हल्ला केला असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच अशा प्रकारच्या घटनांवर आळा बसविण्यासाठी व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी कर्नाटक राज्यातील ३० ते ३५ मासेमारी नौकेतील खलाशी यांच्यावर रत्नागिरी पुर्णगड पोलीस ठाणे गु.र.नं.०७/२०२५, बीएनएस कलम १३२,१८९ (२), १९०, ११५ (२), ३५१ (२) अन्वये दिनांक १०/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) अशा प्रकारच्या घटनांवर आळा घालण्यासाठी खालील सुरक्षाविषय उपाययोजना केल्या आहेत.

(अ) पोलीस, मत्स्यविभाग, कोस्टगार्ड यांचे वतीने संयुक्त गस्त चालु आहेत.

(ब) अशा प्रकारच्या घटना घडु नयेत म्हणून गोपनीय यंत्रणा सतर्क करण्यात आली असुन सदर बाबत कारवाई करण्यात येत आहे.

(क) सुरक्षिततेच्या दृष्टीने समुद्री भागावर निगराणी ठेवण्यासाठी ड्रोनचा वापर व इतर उपाययोजना करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे व रायगड जिल्ह्यात एमआयडीसीतील अनेक कंपन्यांतून सोडण्यात येणाऱ्या रसायन मिश्रित पाण्यामुळे नद्यांच्या प्रदूषणात वाढ झाल्याबाबत

**(११) * १६४३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील तळोजा एमआयडीसीतील घातक व रसायन मिश्रीत पाणी कासाडी नदीत सोडणे तसेच ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा, उल्हासनगर, डोंबिवली येथील एमआयडीसीमधुन अनेक कंपन्या तसेच जिन्स वॉश करणाऱ्या कंपन्या रसायन मिश्रीत पाणी वालधुनी व उल्हासनदीत सोडत असल्याने नदीच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन नागरिक तसेच शेती व जलचर प्राण्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, डोलवी (ता.पेण, जि.रायगड) येथील धरमतर खाडीच्या बाजुला जे.एस.डब्ल्यू कंपनी तसेच अलिबाग तालुक्यातील शहाबाज येथील पी.एन.पी कंपनीतील रसायन मिश्रीत दुषित पाण्यामुळे मच्छिमारी व्यवसाय धोक्यात आला आहे याबाबत अभ्यास करण्यासाठी वरिष्ठ वैज्ञानिक तथा वैज्ञानिक कारभार प्रमुख, केंद्रिय सागरी मस्त्यकी संशोधन संस्था मुंबई (CMFRI) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या नद्यांचे प्रदूषण रोखण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी वेळोवेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे व प्रशासनाकडे तक्रार व निवेदने देऊनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन प्रदूषण रोखणे तसेच यांस जबाबदार असणाऱ्या कंपन्या व दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील औद्योगिक सांडपाणी भूमीगत पाईपलाईनद्वारे सी.ई.टी.पी. मध्ये एकत्रित करून राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेमार्फत निर्देशित स्थळी विसर्ग करण्यात येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सामुहिक सांडपाणी यंत्रणेची वेळोवेळी पाहणी करण्यात येते व सामुहिक सांडपाणी यंत्रणेमध्ये त्रुटी आढळून आल्यास संबंधितांना कारणे दाखवा नोटीस तसेच प्रस्तावित निर्देश बजावण्यात येतात.

ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीमधील मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या उद्योगांनी औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारली असून प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेमार्फत निर्देशित स्थळी विसर्ग करण्यात येते. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत बेकायदेशीर जीन्स वॉश उद्योगांवर नियमानुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

कृषी विभाग तसेच मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या अहवालानुसार प्रश्नाधीन विषयास अनुसरून कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(२) मत्स्यव्यवसाय विभागाकडून प्राप्त अहवालानुसार धरमतर खाडीतील मच्छीमारांच्या समस्या तसेच सागरी किनारपट्टीवरील प्रदूषणामुळे मत्स्योत्पादनावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करण्यासाठी दि.२१/०२/२०१९

रोजीच्या शासन निर्णयानुसार दहा (१०) सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीच्या अद्यापपर्यंत एकूण १० बैठका पार पडल्या आहेत. सदर समितीमार्फत धरमतर खाडीची पाहणी करून धरमतर खाडीतील मच्छीमारांची माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नदी प्रदूषणाविषयी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात येते व नियमानुसार वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यातील हत्या झालेल्या प्रकरणांतील संबंधितांना**
**अटक करुन कारवाई करण्याबाबत**

**(१२) * १७३ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच श्री.संतोष देशमुख यांची दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी झालेली निर्घृण हत्या, मौजे पांढरवाडी तहत रामपुरी (ता.गेवराई) येथील श्री.बालाजी घरबुडे या तरुणाची झालेली निर्घृण हत्या तसेच परळी येथील श्री.महादेव दत्तात्रय मुंडे यांचा दिनांक २४ ऑक्टोबर, २०२३ रोजी खून करण्यात आल्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यात गेल्या पाच वर्षात ३०८ खून, ७६५ खुनाचा प्रयत्न करण्याचे गुन्हे नोंदविण्यात आले असून माहे जानेवारी, २०२४ ते माहे ऑक्टोबर, २०२४ या १० महिन्यांच्या कालावधीत ३६ खूनाच्या घटना नोंदविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शस्त्र परवाना मिळविण्यासाठी संबंधित व्यक्तिला कोणत्याही गुन्ह्यातंर्गत शिक्षा झालेली नसणे आणि कोणत्याही न्यायालयात त्या व्यक्ती संबंधित प्रकरण प्रलंबित नसणे हे निकष असताना एकट्या बीड जिल्ह्यात गुन्हे दाखल असलेल्या २६० जणांना शस्त्र परवाना देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणांमधील आरोपींना तात्काळ अटक करुन शिक्षा करावी, या मागणीसाठी मोठ्या प्रमाणात राज्यभर आंदोलने व मोर्चे सुरु असून अनेक लोकप्रतिनिधींनी या प्रकरणी कडक कारवाई करण्याबाबतची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करुन आरोपींवर कडक कारवाई तसेच या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) बीड जिल्ह्यात मागील पाच वर्षात दाखल गुन्ह्यांत एकुण २७६ खुन, ७६६ खुनाचा प्रयत्न करण्याचे गुन्हे नोंदवण्यात आलेले आहेत. माहे जानेवारी २०२४ ते माहे ऑक्टोंबर २०२४ या १० महिन्यांच्या कालावधीत

३६ खुनांच्या घटना नोंदविण्यात आल्या आहेत.

(३) ज्या गुन्हे नोंद असलेल्या २६० जणांना शस्त्र परवाने देण्यात आले होते, त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांचेकडे सुनावणी होऊन गुन्हे नोंद असलेल्या परवानाधारक तसेच मयत परवानाधारक अशा एकूण १९९ परवानाधारकांची शस्त्रे रद्द/निलंबित केली आहेत.

(४) होय.

(५) मस्साजोग, ता.केज येथील पोलीस स्टेशन केज येथे दाखल गुरनं. ६३७/२०२४, ६३८/२०२४ संदर्भातील तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी करुन ०८ आरोपीतांना अटक केली आहे. सदर आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई सुरु असून ०१ आरोपी नामे कृष्णा आंधळे हा फरार आहे व त्याचा शोध सुरु आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन केज येथील पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांना निलंबीत करण्यात आले आहे. तसेच सदर गुन्हयाचा तपास चालु आहे.

मौजे पांढरवाडी तहत रामपुरी (ता.गेवराई) येथील श्री. बालाजी घरबुडे यांच्या हत्येप्रकरणी पोलीस स्टेशन तलवडा येथे गुरनं.२८७/२०२४ दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

परळी येथील श्री.महादेव दत्तात्रय मुंडे यांच्या हत्येप्रकरणी परळी शहर पोलीस स्टेशन येथे गुरनं. १९१/२०२३ दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

-----------------

## मु.पो. मुखेड (जि.नांदेड) येथील कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांनी तलाठी पदावर नोकरी देण्याचे अमिष दाखवून केलेली फसवणूक

**(१३) * ३११८ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो. मुखेड (जि.नांदेड) येथील कामगार आयुक्त कार्यालयातील वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांसह सात जणांनी तलाठी पदावर नोकरी देतो असे सांगून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कामगार आयुक्त कार्यालयातील वर्ग-१ चे अधिकारी सर्वश्री पवन कुमार चव्हाण, कल्पेश रविकांत जाधव इत्यादींनी श्री.गिरी तसेच अन्य १३ ते १४ जणांची सुमारे दीड ते दोन कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याबाबतचा गुन्हा दिनांक १२ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ही माहिती अंशतः खरी आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी श्री. पवन कुमार चव्हाण हे मुखेड, नांदेड येथील कामगार आयुक्तालयात कार्यरत नसून वांद्रे, मुंबई येथील कामगार आयुक्तालयात कार्यरत असून सदर आरोपी व इतर आरोपी यांनी एकूण रुपये १,१४,००,०००/- ची आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार मुखेड पोलीस ठाणे येथे दि.१०.१२.२०२४ रोजी प्राप्त झाली होती.

(२) व (३) सदर प्रकरणी मुखेड पोलीस ठाणे, जिल्हा नांदेड येथे दि.१०.१२.२०२४ रोजी गु.र.क्र ३६९/२०२४ कलम ४२०, ४०६, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७३, २९४, ५०७, २०१, १२० (ब) भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी एकूण ६ आरोपींना अद्यापपर्यंत अटक करण्यात आली आहे. त्यातील

५ आरोपी हे न्यायालयीन कोठडीत असून एका आरोपीस दि.०७.०२.२०२५ रोजी जामीन मंजूर झाला आहे. सदर आरोपींनी एकूण रुपये १,३४,४८,९९५/- ची आर्थिक फसवणूक केल्याचे अद्यापपर्यंतच्या तपासाअंती निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दि. ०६.०२.२०२५ रोजी क्र. १३/२०२५ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची अवैध विक्री होत असल्याबाबत

**(१४) * १ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.महेश बालदी (उरण), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र विशेषत: मुंबई, मुंबई उपनगरे, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर आणि इतर शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा, चरस तसेच गांजा अशा अंमली पदार्थाची सर्रास व अवैधरित्या विक्री होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुंबईतील अंधेरी, मालवणी, मालाड, मुंब्रा, चांदिवली, घाटकोपर, दहिसर, गोवंडी, माहिम, भिवंडी, कुर्ला तसेच पुण्यातील सावित्रीबाई फुले वसतीगृह इत्यादी अनेक ठिकाणी ड्रग्स व अंमली पदार्थाचा मोठा प्रमाणात साठा पोलीसांनी जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक ठिकाणी अशा प्रकारच्या ड्रग्स विक्रेत्यांची माहिती स्थानिक पोलीसांना देऊनही त्यांचेवर कोणत्याही प्रकारची कारवाई न झाल्यामुळे यात स्थानिक शासकीय यंत्रणेचा देखील सहभाग व संगनमत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, बाजारपेठा, रेल्वे व बसस्थानक अशा अनेक वर्दळीच्या ठिकाणी अशा अंमलीपदार्थांची सर्रास विक्री होत असल्याने विद्यार्थी व स्थानिकांचे आरोग्य धोक्यात आले असून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात मोठ्या प्रमाणात होत असलेल्या अंमली पदार्थांच्या प्रसार विक्रीवर आळा घालण्याबाबत तसेच यात सहभागी असणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यामध्ये सन २०२४ मध्ये अंमली पदार्थ तस्करी, जवळ बाळगणाऱ्या विरूध्द मुंबई, मुंबई उपनगरे, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर या ठिकाणी कार्यवाही करण्यात आली आहे. त्याबाबतची सांख्यिकी माहिती खालील प्रमाणे आहे :-

| **शहर** | **गुन्हे दाखल** | **अटक आरोपी** | **अंदाजे किंमत (कोटी)** |
|---|---|---|---|
| मुंबई व मुंबई उपनगर | ११५३ | १३४२ | ५१२ |
| ठाणे | १०४६ | ११४६ | ११.३७ |
| नवी मुंबई | ११३ | २०६ | ३२.३५ |
| पुणे | १२९ | २०४ | ३६७९.३६ |
| नागपूर | २८५ | ४१२ | ६.२९ |
| कोल्हापूर | ११५ | १८३ | ०.६८ |

राज्यामध्ये सन २०२४ मध्ये अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थी १५८७३ गुन्हे दाखल असून १४२३० इतक्या आरोपींना अटक केली आहे. तसेच अंमली पदार्थ जवळ बाळगणे / वाहतुक करणे बाबत एकूण २७३८ गुन्हे दाखल केली असून त्यामध्ये एकूण ३६२७ आरोपींना अटक करण्यात आली आहे व एकूण रू. ४२४०. ९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे.

(२) बृहन्मुंबईतील सर्व पोलीस ठाणे, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा युनिटकडून परिसर निहाय सन २०२३ ते फेब्रुवारी-२०२५ पर्यंत केलेल्या कार्यवाहीची सांख्यिकी माहिती खालील प्रमाणे आहे :-

| **ठिकाण/ परिसर** | **दाखल गुन्हे** | **अटक आरोपी** | **जप्त मुद्देमाल कि.ग्रा.** |
|---|---|---|---|
| अंधेरी | ३१७ | ३६९ | १५४.९८१ |
| मालवणी | १४६ | १५७ | १२६.५३६ |
| मालाड | ४६ | ७२ | ५८.२८८ |
| चांदिवली | ४२ | ४८ | ८२.३६७ बॉटल्स-१४ |
| दहिसर | ५२ | ५७ | १७.८७१ बॉटल्स-२२ |
| घाटकोपर | ९४ | ११० | ४१.२३७ |
| गोवंडी | २३ | ३३ | १११.०९९ बॉटल्स-१९६८ |
| माहिम | २४ | ४१ | १०५.६६५ |
| कुर्ला | ६३ | ९४ | ३८३.४५८ |

पुणे शहरातील सावित्रीबाई वसतीगृह, पुणे येथे दि.२८.०५.२०२४ रोजी आरोपी कडून रू.७००/- किंमतीचा व १४ ग्रॅम वजनाचा गांजा सदृश्य हिरवट रंगाचा झाडपाला सारखा दिसणारा पदार्थ / माल जप्त करण्यात आला असून त्यांच्या विरूध्द एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(सी), २०(बी) (ii) (ए) अन्वये गु.र.नं ४७५/ २०२४ अन्वये चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) राज्यात अंमली पदार्थावर नियंत्रण व उच्चाटन :-

- राज्यात अंमली पदार्थाच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्याकरीता शासनाने महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये स्वतंत्र "अंमली पदार्थ विरोधी कक्ष" स्थापन केलेला आहे.
- शासनाने राज्याकरीता स्टेट ॲपेक्स लेव्हल कमिटी व दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाद्वारे "ॲन्टी नार्कोटिक्स टास्क फोर्स" ची (ANTF) निर्मिती केली आहे.
- पोस्ट ऑफीस व कुरीअर सेवा कंपन्यांच्या पार्सल सेवेच्या माध्यमातून अंमली पदार्थाच्या होणाऱ्या विक्रीस आळा घालण्याकरीता पोस्ट ऑफीस व कुरीअर सेवा कंपन्यांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मार्गदर्शक सुचनावली तयार करून त्यांना पाठविण्यात आली आहे.
- जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त दरवर्षी २६ जून पासून पंधरा दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्षामार्फत तसेच स्थानिक पोलीस ठाणे मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानके व महत्वाच्या चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स लावले जातात, पत्रके वाटली जातात. तसेच पथनाट्य आयोजित करून जनजागृती केली जाते. इतर वेळी सुध्दा ठिकठिकाणी अशासकीय सामाजिक संस्थाच्या सहकार्याने अंमली पदार्थ विरोधात जनजागृतीचे कार्यक्रम आयोजीत केले जातात.
- अंमली पदार्थ विरोधी काम करणाऱ्या अशासकीय संस्था व राज्य शासनामार्फत चालविण्यात येणारी व्यसनमुक्ती केंद्रे येथील पदाधिकाऱ्यांशी समन्वय ठेवला जातो. व्यसनाधीन लोकांना व त्यांच्या नातेवाईकांना त्याबाबत माहिती दिली जाते.
- स्वयंसेवी संस्था व आरोग्य विभाग यांच्या मार्फत व्यसनी तरूणांचे पुर्नवसन करणे, व्यसनमुक्ती केंद्रातून अशा तरूणांचे समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येते.

-----------------

## सोनाळा (जि.बुलढाणा) येथील पुरातन हनुमान मंदिरात झालेली चोरी

**(१५)** * **२४०९ डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनाळा (जि.बुलढाणा) येथील सातपुड्याच्या पायथ्याशी व मध्यप्रदेशाच्या सीमेवर असलेल्या समर्थ रामदास स्वामींद्वारे स्थापित केलेल्या पुरातन हनुमान मंदिरात दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास चोरी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंदिरातील पुजाऱ्याला बांधून ठेवून हनुमानाच्या मुर्तीवरील ५ किलो चांदिच्या दागिन्यांची आभुषणे तसेच दानपेटीतील ७० हजार रुपयांची रक्कम चोरी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

सोनाळा, जि.बुलढाणा येथील सातपुड्याच्या पायथ्याशी व मध्यप्रदेशाच्या सीमेवर असलेल्या वारी हनुमान मंदिरात दिनांक १४.०१.२०२५ चे रात्री २२.३० वा. ते १५.०१.२०२५ रोजीचे ०५.०० वा. दरम्यान चोरी

झाली आहे.

वारी हनुमान मंदिरात झालेल्या चोरीमध्ये हनुमान व गणपती यांच्या मूर्तीवरील ५ किलोचे चांदीचे दागिणे व मंदिरात असलेल्या दोन दानपेटीमधील अंदाजे रु.७०,०००/- असा एकूण ३,४२,५००/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल चोरी गेला आहे. तथापि सदर मंदिरातील पुजाऱ्याला बांधून मारहाण झाल्याबाबत मंदिराच्या पुजाऱ्याकडून पोलीसांकडे तक्रार प्राप्त नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी दि.१५.०१.२०२५ रोजी प्राप्त फिर्यादीवरुन सोनाळा पोलीस ठाणे, जि.बुलढाणा येथे गु.र.नं.०९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०५, ३३१ (४) अन्वये अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलीसांकडून घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून फिर्यादी, साक्षीदार, मंदिराचे ट्रस्टी, मंदिरातील कामगार, पुजारी आणि परिसरामध्ये राहणारे नागरिक यांचे बयाण घेण्यात आले आहेत. तसेच, सोनाळा, टुनकी, बावनबीर, अकोट, तेल्हारा, हिवरखेड व अकोला येथील सर्व सोनार दुकानदार यांचे बयाण घेण्यात आले असून काही माहिती मिळल्यास संपर्क साधण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. सोनाळा तसेच वारी हनुमान फाटा, हिवरखेड हद्दीतील व अकोट हद्दीतील सी सी टी व्ही फुटेज तपासणी केली असून मेळघाट व्याघ्रप्रकल्प येथील झरी तपासणी नाका येथेसुध्दा चौकशी करण्यात आली आहे. पोलीसांकडून सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु असून आरोपींचा शोध घेणे चालु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यात विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्यासह औषधे उपलब्ध करून देण्याबाबत

**(१६) * ९१९ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यात विविध संवर्गातील रिक्त पदे, तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसणे, आधुनिक वैद्यकीय उपकरणे, यंत्रसामुग्री व औषधांचा तुटवडा तसेच प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, इमारती उपलब्ध नसणे, डॉक्टरांकरीता निवास व्यवस्था नसणे इत्यादी अनेक कारणांमुळे पशुवैद्यकीय सेवा वेळेत मिळत नसल्याने पशुपालकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत असून अनेक ठिकाणी उपचाराअभावी जनावरांचा मृत्यु होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कारणांमुळे सांगली जिल्ह्यातील शिराळा, वाळवा, खानापूर, आटपाडी व तासगाव या ठिकाणी असलेली पशुवैद्यकीय सेवा मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली असून, अनेक ठिकाणी यात मोठ्या प्रमाणात पशुधनाचे व परिणामी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापी कापूसखेड, पेठ, रेठेरे धरण (ता.वाळवा, जि.सांगली) व मौजे देवगांव (ता.पारोळा, जि.जळगांव) येथे शासकीय पशुवैद्यकीय दवाखाने नसल्याने तेथील स्थानिकांकडून नवीन पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करण्यात यावे अशी मागणी स्थानिकांकडून लोकप्रतिनिधींकडे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत अनेक शेतकरी, नागरीक व लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केली असून, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) कापूसखेड, पेठ, रेठरे धरण (ता. वाळवा, जि. सांगली) येथे पशुवैद्यकीय दवाखाना संस्था कार्यरत आहेत. तसेच मौजे देवगांव (ता. पारोळा, जि. देवगाव) येथे सद्यस्थितीत पशुवैद्यकीय दवाखाना अस्तित्वात नाही मात्र देवगांव हे तामसवाडी पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात मोडत आहे. या दोन्ही गावामधील अंतर सुमारे ५ कि.मी. आहे. तामसवाडी पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात ५८०६ इतके पशुधन असून, त्यापैकी देवगाव गावाचे ९४१ पशुधन समाविष्ट आहे. प्रचलित निकषानूसार प्रत्येक दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात किमान ५००० पशुधन घटक असणे आवश्यक असल्याने नवीन दवाखान्याचा निकष पूर्ण होत नाहीत. मौजे देवगाव व परिसरातील पशुधनास तामसवाडी पशुवैद्यकीय दवाखान्याद्वारे सेवा पुरविण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नायलॉन मांजामुळे ७ जणांचा झालेला मृत्यु

**(१७) * ३८३ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी पतंग उडवितांना नॉयलॉन मांजामुळे कित्येक लोकांचा मृत्यु होऊन अनेक जण यामध्ये गंभीर जखमी झाले तर शेकडो पक्षी मृत झाल्याच्या अनेक घटना नुकत्याच घडल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यात नायलॉन मांजावर बंदी असतांनाही सर्वत्र या मांजीची विक्री होत असून याबाबत अद्याप कोणतेही धोरण वा कायदा करण्यात आला नाही अथवा अस्तित्वातील कायद्याची प्रभावी अंमलबजावणी देखील होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नॉयलॉन मांजाची राज्यात मोठ्या प्रमाणात अवैध साठवणूक व चढ्या दराने विक्री होत असून अशा मांजाच्या उत्पादनावर तसेच बाहेरच्या देशातून होणाऱ्या आयातीवर बंदी घालून अशा उत्पादकांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई करून जखमींना उपचारार्थ आर्थिक व तातडीची मदत तसेच मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यासह नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीवर प्रतिबंध करण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

कृत्रिम धाग्याच्या वापराचा प्रतिकुल परिणाम सर्वसाधारण सुरक्षेवर आणि जैवविविधतेवर होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यासाठी आणि अशा धाग्याऐवजी पर्यायी पर्यावरण पूरक धाग्यांच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम ५ आणि पर्यावरण (संरक्षण) नियम १९८६ च्या नियम ४ च्या पोट-नियम (५) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून पर्यावरण विभागाने दिनांक ०१.०३.२०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये नायलॉन मांजाच्या विक्री, उत्पादन, साठवण, पुरवठा आणि वापर यावर निर्बंध घातले आहेत. तसेच, सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्याकरिता विविध अधिका-यांना त्यांच्या संबंधीत अधिकार क्षेत्रात प्राधिकृत करण्यात आले आहे.

सदर अधिसूचनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पर्यावरण विभागामार्फत दिनांक २५.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यप्रणाली तयार करण्यात आली आहे.

नायलॉन मांजा वापर व विक्रीस पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ च्या कलम ५ अन्वये प्रतिबंध घालण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.१३.१०.२०१६, २५.०८.२०२१ व दि.०८.०३.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटक कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) नायलॉन मांजा विक्री व मांजा बाळगण्यावर बंदी घालण्यात आलेली असूनही ज्या व्यापाऱ्यांच्या दुकानात मांजा आढळून येतो असे दुकानदार, नायलॉन मांजाची तस्करी करणारे, नायलॉन मांजाच्या सहाय्याने पतंग उडविणारे नागरिक यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ (भारतीय दंड संहिता कलम १८८), पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कलम ५, १५ आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६८ (सीआरपीसी कलम १४९) अन्वये कारवाई करण्यात येते. तसेच, नायलॉन मांजामुळे मृत्यु झाल्यास सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येतो. सबब, नायलॉन मांजाच्या उत्पादकांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची कारवाई पोलीसांकडून करण्यात आली नाही.

नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीवर प्रतिबंध करण्यासाठी शाळां-कॉलेजमध्ये जनजागृती करणे, राज्याच्या सीमा चेक पोस्ट वर संनियत्रण करणे, सिंथेटिक/नायलॉन मांजाचे उत्पादन करणारे कारखाने शोधून काढणे यांसारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना शासनाच्या विविध विभागांमार्फत करण्यात येतात.

राज्यामध्ये सिंथेटिक/नॉयलॉन मांजाची विक्री, उत्पादन, साठवण, पुरवठा आणि वापर यावर निर्बंध सुनिश्चित करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या सर्व अधिका-यांची महिन्यातून एकदा आढावा बैठक घेण्यात येते.

तसेच, नायलॉन मांजाचा बेकायदेशीर वापर रोखण्यासाठी सोशल मिडीया व प्रसार माध्यमांद्वारे जनतेस नायलॉन मांजा वापराच्या दुष्परिणामाबाबत जनजागृती येत असून ऑनलाईन शॉपींग कंपन्या उदा. फ्लिपकार्ट, ॲमॅझॉन इ. यांना ऑनलाईन मांजा विक्री न करण्याबाबत सायबर विभागाकडून ई-मेलद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### श्रीगोंदा (जि.अहिल्यानगर) येथील बचत गटातील महिलांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(१८) * २७३२ श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा):** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गरीब महिलांना सक्षम करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत अनेक योजना राबविण्यात येत असून, या महामंडळामार्फत ग्रामीण भागातील अनेक महिला बचत गटांना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे,

हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनाचा गैरफायदा घेणाऱ्या श्री.जयवंत गायकवाड व त्यांची पत्नी श्रीमती आम्रपाली कांबळे यांनी संगनमताने श्रीगोंदा मतदारसंघातील अनेक बचत गटातील महिलांना एक ग्रॅम सोन्याच्या दागिन्याच्या व्यवसायातून एका वस्तूवर एक वस्तू मोफत अशा प्रकारचे प्रलोभन दाखवून खरेदी-विक्रीचे व्यवहार केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यातून येणारा प्रचंड प्रतिसाद पाहून साईराज अपार्टमेंट, मांडवगण रोड, श्रीगोंदा शहर येथे भाडेतत्वावर कार्यालय उघडून महिलांना अर्ध्या किमतीमध्ये शिलाई मशिन, एक हजार रुपयात तिरुपती बालाजी मंदिर सहल अशा योजना आखून पैसा जमा केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशी अनेक अमिषे दाखवून अनेक महिलांना या दाम्पत्यांनी फसविल्याने त्यांच्याविरुद्ध श्रीगोंदा पोलीस ठाणे, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असूनही त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधिताविरुद्ध कारवाई करुन महिलांना पैसे परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही. हे, खरे नाही.

महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत ग्रामीण भागातील अनेक महिला बचत गटांना बॅंकांकडून कर्ज उपलब्ध करुन देण्यास सहकार्य करण्यात येते. परंतु, महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत बचत गटांना कोणतेही आर्थिक सहाय्य करण्यात येत नाही.

(२), (३), (४), (५) व (६) सदर प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाणे, अहिल्यानगर येथे तक्रार अर्ज प्राप्त असून सदर तक्रारअर्जाची चौकशी सुरु आहे. यामध्ये, साक्षीदारांचे जबाब नोंदवले असून प्रकरण सध्या तपासाधीन आहे.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील अनेक नद्यांमध्ये सांडपाणी व रसायनमिश्रीत पाणी सोडल्याने प्रदूषणात वाढ झाल्याबाबत

**(१९) * २६८ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाबाजी काळे (खेड-आळंदी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मुळा, मुठा, पवना, इंद्रायणी व भीमा या नद्यांमध्ये सोडण्यात येणारे सांडपाणी, कंपन्यांमधील प्रक्रिया न केलेले रसायन मिश्रीत पाणी, प्रदुषणामुळे निर्माण झालेली जलपर्णी इ. अनेक कारणांमुळे नागरिकांचे व जलचर प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील हिंजवडी मधील राजीव गांधी इन्फोटेक (आयटी) पार्क मधील सामाईक सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता मुळा नदीत थेट सोडल्यामुळे झालेल्या प्रदूषणाबाबत सदरहू प्रकल्पाला प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नोटीस देखील बजावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वेळोवेळी निवेदन व बैठका घेऊन यासंदर्भात उपाययोजना करणेबाबत तसेच जलपर्णी नष्ट करण्यासाठी श्री. शेखर भाडसावली यांचे तंत्रज्ञान वापरण्याचे आदेश

देऊनही यासंदर्भात कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त नद्यांमधील जलपर्णी काढण्यांच्या नावाने कोट्यवधी रुपयांच्या निविदा वाढीव दराने काढण्यात आल्या असून अधिकाऱ्यांच्या सगनंमताने कंत्राटदार ही जलपर्णी न काढता देयके घेत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे जिल्ह्यातील सर्व नद्यांचे प्रदूषण रोखण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी वेळोवेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे व प्रशासनाकडे दिलेल्या निवेदनांसंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन नद्यांचे प्रदूषण रोखणे तसेच यांस जबाबदार असणाऱ्या कंपन्या व दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व नदीकाठावरील नगरपालिका व गावांच्या हद्दीमधून विनाप्रक्रिया घरगुती सांडपाणी प्रश्नाधीन नद्यांमध्ये मिसळत असल्याने नद्यांचे प्रदूषण होत असल्याचे दिसून येते.

पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे यांच्या अहवालानुसार प्रश्नाधीन विषयाच्या अनुषंगाने कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.१०/१०/२०२३ रोजी आयोजित बैठकीमध्ये जलपर्णी नष्ट करण्याच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश दिले होते. तसेच सदर तंत्रज्ञानामध्ये वापरण्यात येणाऱ्या ग्लायफोसेटच्या परिणामांच्या अनुषंगाने सर्व चाचण्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने करण्याचे निर्देश दिले होते.

सदर निर्देशांच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या तपासणीमध्ये ग्लायफोसेटच्या वापरास केंद्रीय कृषि विभागाकडून बंदी घालण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि.३०/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये पुणे महानगरपालिकेस अवगत करण्यात आले आहे.

(४) पुणे महानगरपालिका हद्दीतील नद्या व तलावांमधील जलपर्णी काढण्याकरीता पुणे महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी निविदा प्रक्रिया राबवण्यात येते.

(५) व (६) हे खरे नाही.

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नदी प्रदूषणाविषयी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वेळोवेळी पाहणी करण्यात येते व नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येते.
- राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यातील मुळा-मुठा नदी संवर्धनाच्या रु.९९०.२६ कोटी किंमतीच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिली असून सदर प्रकल्पाचे काम पुणे महानगरपालिकेकडून प्रगतीपथावर आहे.
- पुणे महानगरपालिकेचा राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत इंद्रायणी नदी संवर्धनासाठी रु.५७७.१६ कोटी रुपये किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य शासनामार्फत जलशक्ती मंत्रालयाकडे सादर करण्यात आला आहे.

- नमामी चंद्रभागा अभियानांतर्गत पुणे जिल्हयातील भिमा नदीच्या उपनद्यांच्या काठावरील गावांतील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रथम टप्यात भिगवण ता. इंदापूर येथे २.९० दशलक्ष लिटर क्षमतेचे व मांडवगण फराटा ता. शिरुर येथे ०.७५ दशलक्ष लिटर क्षमतेचे प्रकल्प प्रगती पथावर आहेत.
- नमामि चंद्रभागा अभियानांतर्गत दुसऱ्या टप्यामध्ये एकूण ९ गावांस नमामी चंद्रभागा प्राधिकरणाकडून मान्यता प्राप्त झालेली असून याबाबतचे सविस्तर प्रकल्प आराखडे (DPR) तयार करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्या स्तरावर सुरू आहे.

-----------------

## कृषि आयुक्त कार्यालय (जि.पुणे) येथील फलोत्पादन विभागातील उपसंचालक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली अटक

**(२०) * २३९ श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि आयुक्त कार्यालय (जि.पुणे) येथील फलोत्पादन विभागातील उपसंचालक यांनी गैरव्यवहार प्रकरणात निलंबित केलेल्या कर्मचाऱ्याकडून तीन लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा सुमारास त्यांना पकडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी, तक्रारदार यांनी दिलेल्या लाचेच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०.०१.२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार यांचेवरील निलंबनानंतरच्या कारवाई मध्ये मदत करण्यासाठी व त्यांचेवर एफ.आय.आर दाखल न करणेसाठी आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे सुरवातीस तीन लाख रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती अडीच लाख रुपयांची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

तदनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आलोसे कृषी उपसंचालक (फलोत्पादन-४) तथा प्रभारी सहसंचालक, फलोत्पादन, कृषी आयुक्त कार्यालय, शिवाजीनगर, पुणे यांना पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून रु.२,५०,०००/- (रुपये दोन लक्ष पन्नास हजार फक्त) इतकी लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आल्यामुळे त्यांच्याविरुध्द येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ अन्वये गुन्हा क्रमांक २३/२०२५ प्रमाणे दिनांक ११.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच दिवशी त्यांना अटक करण्यात आली होती. तदनंतर दिनांक १८.०१.२०२५ रोजी त्यांना जामीन मंजूर झाला आहे.

(३) सदर प्रकरणी, दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने, आलोसे कृषी उप संचालक (फलोत्पादन-४) तथा प्रभारी कृषि सह संचालक यांना कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ मधील नियम ४(२) (अ) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन, दिनांक ०५.०२.२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये अटक केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच

दिनांक ११.०१.२०२५ पासून मानीव निलंबित केले आहे.

तसेच आलोसे यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीबाबतची कार्यवाही कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळामार्फत बस गाडया खरेदीत अनियमितता झाल्याबाबत**

**(२१) * २३ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्राविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळामार्फत (एसटी) १३१० बस गाडया खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असून, यात सुमारे २ हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाडया खरेदीच्या मूळ प्रस्तावात शासनाच्या मान्यतेनंतर परिवहन विभागाने ठेकेदारांच्या हितासाठी निविदेतील अटी व शर्तींमध्ये परस्पर बदल केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सदर निर्णयास मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये स्थगिती दिलेली असून त्याप्रकरणी परिवहन विभागाच्या अप्पर सचिवांमार्फत चौकशीचे आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करुन यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२), (३), (४) व (५) राज्य परिवहन महामंडळामार्फत १३१० बस गाड्यांच्या खरेदी प्रकियेत अनियमिता झाल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याने चौकशी करुन सदरची प्रक्रीया रद्द करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत

**(२२) * ११० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढत असतांना दुधाच्या मागणीत घट, अतिरिक्त दुधाचा निर्माण झालेला प्रश्न, दुधाच्या दरात झालेली घट, शासनाकडून मिळणारे अनुदान कमी असणे, अनुदानाची थकबाकी तसेच वाढीव अनुदानाच्या घोषणेची अंमलबजावणी न होणे इत्यादी अनेक कारणास्तव दुध उत्पादक व शेतकरी दुहेरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुध उत्पादकांना लिटरमागे संघाकडून २६ रुपये व त्यात शासन अनुदान ५ रुपये मिळत असून, अनुदान रकमेत शासनाने २ रुपये वाढ करण्याचा निर्णय घोषित करणे मात्र संघाने प्रतिलिटरला ३ रुपये कमी करणे, त्यातच शासनाचे अनुदानही आता मोठ्या प्रमाणात थकीत असल्यामुळे उत्पादकांना प्रतिलिटर मागे जवळजवळ १० रुपयाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकीकडे शासनाने अनुदानात २ रुपये वाढ करण्याची घोषणा करणे परंतु त्याची अंमलबजावणी न होणे त्याचवेळी ५ रुपयाप्रमाणे दिले जाणारे अनुदानाचे देखील प्रदान प्रलंबित असल्याने दुध उत्पादक आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, एकीकडे पशुखाद्याच्या दरात वाढ होत असताना दुधाचे दर मात्र कमी झाल्यामुळे दुध दरात वाढ करून प्रलंबित व वाढीव अनुदानाची रक्कम विनाविलंब मिळण्याकरीता दुध उत्पादक व स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वेळोवेळी शासनाकडे मागणी करुनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) राज्यातील दुधाचे कोसळलेले दर विचारात घेता, शासनाने दूध उत्पादकांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी दि.१२ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दुधास प्रति लिटर रु.५/- अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. सदर अनुदान सहकारी व खाजगी दूध प्रकल्पांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना किमान रु.३०/- प्रतिलिटर इतका दर रोखविरहीत (ऑनलाईन) अदा केल्यानंतर शासनामार्फत रू.५/- अनुदान अदा करण्यात आले आहे.

सदर योजनेपोटी राज्यातील सहकारी संघ व खाजगी दूध प्रकल्पांना दूध पुरवठा करणाऱ्या ६,०२,२७३ युनिक दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट डीबीटीद्वारे रु.५३८.५६ कोटी अनुदान वर्ग करण्यात आले आहे.

(३) व (४) दूध दरात अपेक्षित सुधारणा न झाल्याने शासनाने दि.२६ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दूध अनुदानात प्रति लिटर रु.२/- ने वाढ करुन प्रति लिटर रु.७/- देण्याचा निर्णय घेतला. ज्या दूध उत्पादकांनी

दूध संघांमार्फत/संस्थांमार्फत त्यांचे आधार संलग्नीत बँक खाते, नाव, पशुधनाचा टॅग क्रमांक अशी अचूक माहिती भरली आहे. त्यांचे अनुदान वितरीत करण्यात येत असून अचूक माहिती न भरलेल्या दूध उत्पादकांची दूधसंघामार्फत भरण्यात येणारी सुधारीत माहिती तपासून दूध उत्पादकांना थेट अनुदान वितरीत करण्यात येईल.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भांडुप (पश्चिम) व्हिलेज रोड येथील जी.एस. शेट्टी इंटरनॅशनल शाळेतील अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराबाबत

**(२३) * १८८९ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भांडुप (पश्चिम) व्हिलेज रोड येथील एका नामांकित जी.एस.शेट्टी इंटरनॅशनल शाळेमध्ये लिफ्ट दुरुस्त करणाऱ्या एका मॅकॅनिकने शाळेतील १० ते १२ वर्षीय अल्पवयीन मुलींचा विनयभंग करून लैंगिक अत्याचार केला असल्याचे दिनांक २७ नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मुलींच्या पालकांनी भांडुप पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी गुन्हा नोंद करुनही लिफ्ट मेकॅनिक गोपाळ भोगानी गौड याच्याविरुद्ध तसेच शाळेच्या संचालक व मुख्याध्यापक यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबईतील भांडुप (पश्चिम) व्हिलेज रोड येथील जी.एस.शेट्टी इंटरनॅशनल शाळेतील अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी मुलीच्या पालकांनी आरोपीविरुध्द भांडुप पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.९०३/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७८ सह लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियमाचे कलम ८, १२ अन्वये दि.२७.११.२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) व (४) सदर गुन्ह्यातील आरोपी अटक असून आरोपीविरुध्द मा. विशेष सत्र न्यायालय, मुंबई येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. तसेच शाळेचे संचालक व मुख्याध्यापक यांचा अद्यापपावेतो सदर गुन्ह्यात कोणताही सहभाग निष्पन्न झालेला नसल्याने त्यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्रीरामपूर (ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर) येथे माजी लोकप्रतिनिधींवर झालेला गोळीबार

**(२४) * २७२२ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर) येथील लोकप्रतिनिधी (माजी विधानसभा सदस्य) यांचेवर दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास गोळीबार झाल्याची घटना घडली असल्याचे निदर्शनास आले

आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी माजी विधानसभा सदस्य यांनी अज्ञात व्यक्तींविरोधात फिर्याद दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर फिर्यादीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) माजी आमदार श्री.भाऊसाहेब मल्हारी कांबळे यांनी त्यांच्यावर दिनांक २०/११/२०२४ रोजी गोळीबाराची घटना घडली असल्याची फिर्याद श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशन, श्रीरामपुर येथे दाखल केली आहे.

(२) होय.

(३) तांत्रिक माहितीच्या आधारे फिर्यादी यांच्या गाडीचा पाठलाग करुन त्यांचे गाडीला मोटारसायकल आडवी लावणारे तीन इसमांपैकी इसम नामे विशाल सदानंद पिंगळे यास दि. १२/०२/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच इसम नामे मनोज संजय साबळे हा सध्या श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन गु.र.नं ५८/२०२५ बी.एन.एस कलम १०९ वगैरे गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीत असून तपासकामी त्याचा ताबा देण्यास मा. न्यायालयाने नकार दिला आहे. त्यामुळे तो सदर गुन्ह्यात जामीनावर मुक्त होताच त्यास ताब्यात घेवून पुढील सखोल तपास करण्याची तजवीज ठेवली आहे. तसेच तिसरा इसम नामे अशोक ऊर्फ बाबु रामा साळवे यास दि.१३/०२/२०२५ रोजी अटक करण्यात आली असुन पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर येथील कारखान्यांच्या प्रदुषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊन शेतपिकांचे झालेले नुकसान

**(२५) * ९७ श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवली (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील टायर कंपन्या तसेच टायर पासून ऑईल बनविणाऱ्या कंपन्यांच्या प्रदूषणामुळे तसेच माती भरावामुळे मुसारणेपाडा, चिंचघरपाडा, तसेच मौजे सापने (खु.) गावात आवारीपाडा, जाधवपाडा, सुतारपाडा, माळीपाडा, शिवालयनगर, कोलेकरपाडा या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून जलचर प्राणी व शेतीपिकांचे देखील मोठे नुकसान होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे गावातील शेती नापीक होऊन शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे साधन नष्ट होत असून उक्त कंपन्यांमधून निघणाऱ्या धुरामुळे नागरिकांना श्वसनाचे आजार होत असणे तसेच माती भरावामुळे नाल्याचा मार्ग बदलुन रासायनिक पाणी शेतकऱ्यांच्या शेतात येत असल्याने जनावरासह मानवी आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बोईसर एमआयडीसीतील कारखान्यांमधील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता नदी-नाल्यांमध्ये सोडल्यामुळे मोठ्या प्रमाणात जल प्रदुषण होऊन नागरिक व जलचर प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रदुषण करणाऱ्या कंपन्यांचे काम बंद करण्यासाठी ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, पालघर यांना लेखी निवेदन देऊनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) आरोग्य विभागाच्या अहवालानुसार मुसारणे व चिंचघरपाडा, सापने खुर्द, आवारीपाडा, जाधवपाडा, सुतारपाडा, माळीपाडा, शिवालयनगर, कोलेकरपाडा या भागामध्ये केलेल्या सर्वेक्षणादरम्यान कोणत्याही साथीच्या आजाराचे किंवा गंभीर आजाराचे रुग्ण आढळून आले नाहीत.

कृषि विभागाच्या अहवालानुसार मौजे सापने (खु) येथे पिकांचे नुकसान झाल्याचे दिसून आले नाही. तथापि, मौजे वडवली व मुसारणे येथे पिकांवर कमी अधिक प्रमाणात राखेचे अंश दिसून आले आहेत.

महसूल विभागाकडून प्राप्त अहवालानुसार वडवली ग्रामपंचायत हद्दीतील टायर कंपन्या तसेच टायरपासून ऑईल बनविणाऱ्या कंपन्यांच्या प्रदूषणामुळे तसेच माती भरावामुळे जलचर प्राणी व शेतीपिकांचे नुकसान झाल्याबाबतची तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्नाधीन विषयाबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे प्राप्त निवेदन प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मौजे पाली, ता.वाडा, जि.पालघर येथील संबंधित उद्योगाची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीनंतर सदर उद्योगास दि.०७/०८/२०२४ रोजी प्रस्तावित आदेश व दि.२२/०८/२०२४ रोजी अंतरिम आदेश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील लीलावती रुग्णालयातील तत्कालीन विश्वस्तांनी ट्रस्टच्या बँक खात्यातील कोट्यवधींची रक्कम अवैधपणे खर्च केल्याबाबत

**(२६) * २८७ श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लीलावती रुग्णालयातील ट्रस्टचा ताबा घेऊन तत्कालीन विश्वस्तांनी ट्रस्टच्या बँक खात्यातील कोट्यवधी रूपयांची रक्कम वेगवेगळया माध्यमातून अवैधपणे खर्च केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी वांद्रे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन प्राप्त झालेल्या अहवालात काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) आणि (४) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी वांद्रे पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ९७२/२०२४, कलम ४०६, ४२०, ३४ भा. द. वि. अन्वये दि.०७.०७.२०२४ रोजी व मा.प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, १२ वे न्यायालय वांद्रे (पुर्व) यांचे दि.३०.१२.२०२४ चे आदेशान्वये दाखल गु. र. क्र. १९१६/२०२४, कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ३४ भा. द. वि. अन्वये दि.३०.१२.२०२४ (आ. गु. वि. गु. र. क्र. ०८/२५, दि.१८.०१.२०२५) रोजी गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. वांद्रे पोलीस ठाणे गु. र.क्र. ९७२/२०२४ व गु. र. क्र. १९१६/२०२४ हे दोन्ही गुन्हे तपासाधीन आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील एमआयडीसी परिसरात सिमेंट कंपन्यांसह विविध कंपन्यांमुळे होणारे वायू व जल प्रदूषण रोखण्याबाबत

**(२७) * ८६५ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरूर (जि.चंद्रपूर) येथील एमआयडीसी परिसरात सिमेंट कंपन्यांसह विविध कंपन्यांचे उद्योग कार्यरत असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात वायू व जल प्रदुषणात वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील उद्योगांच्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी व पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून कृषी विभागांद्वारे पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नांदाफाटा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथील अल्ट्राटेक, माणिकगड या सिमेंट कंपन्यामुळे गडचांदूर, बैलमपूर, मानोली, गोपाळपूर येथे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रदूषण नियंत्रण करणाऱ्या मशिनरी कार्यान्वित नसणे व कच्च्या मालाची वाहतूक करीत असताना मोठ्या प्रमाणात धुळ उडत असणे तसेच कारखान्यातून बाहेर पडणारी धूळ व सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता हवेत व नदी, नाल्यांमध्ये सोडले जात असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून जलचर प्राणी व शेतीपिकांचे देखील मोठे नुकसान होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत नागरिकांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे व प्रशासनाकडे अनेक तक्रारी करून सुद्धा कंपनीकडून जल प्रदूषण व वायू प्रदूषण नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. प्रश्नाधिन विषयाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबतचे कोणतेही लेखी निवेदन कृषी विभागास निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार नागरीकांमध्ये आरोग्याची समस्या निर्माण झाल्याचे तक्रार प्राप्त झालेल्या नाहीत.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार शेतपिकांचे नुकसान होत असल्याची कोणतीही तक्रार अथवा निवेदन प्राप्त झालेले नाही.

सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय यांचेकडून प्राप्त अहवालानुसार जिल्हयात जलचर प्राण्यावर विपरित परिणाम होऊन नुकसान होत असल्याबाबत कोणतीही तक्रार अथवा निवेदन प्राप्त झालेले नाही.

(५) हे खरे नाही.

(६) एम.आय.डी.सी. तडाली येथील उद्योगांना तसेच, नांदाफाटा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथील सिमेंट उद्योगांना मंडळाच्या अधिकाऱ्यांतर्फे वेळोवेळी भेटी देऊन पाहणी करण्यात येते. पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधीत उद्योगांवर नियमाप्रमाणे आवश्यक कारवाई केली जाते व त्रुटींची पूर्ततेचे अनुपालन होईल याची खात्री महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ करत असते.

-----------------

## राज्यात पोलीस उपनिरीक्षक या पदाकरिता राज्य शासनाच्या इतर विभागानुसार दोन वर्षाची वयोमर्यादा वाढवून देण्याबाबत

**(२८) * ५५७ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलीस विभागांतर्गत पोलीस उपनिरीक्षक (P.S.I.) भरती करिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ६१५ पदांकरिता दिनांक १० डिसेंबर, २०२३ मध्ये पूर्वपरिक्षा घेऊन त्याचा निकाल मात्र दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरम्यानच्या कालावधीत पुर्व परिक्षा उत्तीर्ण झालेल्या ३०० उमेदवारांना वयोमर्यादा पार केल्याच्या कारणास्तव मुख्य परिक्षेसाठी अपात्र ठरविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोविड-१९ नंतर राज्य शासनाने अन्य विभागाकरिता आयोजित केलेल्या सरळसेवा भरतीकरिता कमाल वयोमर्यादा २ वर्षाने शिथिल केली होती, परंतू पोलीस उपनिरीक्षक (P.S.I.) पदाच्या भरतीकरिता हा नियम लागू न करण्यात आल्यामुळे अनेक उमदेवारांवर अन्याय झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू भरती प्रक्रियेसाठीची कमाल वयोमर्यादा २ वर्षांनी वाढवून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे अंशतः खरे आहे.

कमाल वयोमर्यादेपेक्षा अधिक वय असलेल्या २४६ उमेदवारांना वगळून उर्वरीत उमेदवारांचा निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.२९.०८.२०२४ रोजी जाहीर केला आहे.

(३) व (४) सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०३.०३.२०२३ व दि.२०.१२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरळसेवेने नियुक्ती संदर्भात प्रसिद्ध होणा-या सर्व जाहिरातींकरीता कमाल वयोमर्यादेत अनुक्रमे २ वर्षे व १ वर्ष इतकी शिथीलता देण्यात आली आहे. तथापि, पोलीस उपनिरीक्षक मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षा ही सरळसेवेची परीक्षा नसून पोलीस दलामध्ये कार्यरत असणाऱ्या पोलीस अंमलदारांकरीता पोलीस उपनिरीक्षक

पदासाठी घेण्यात आलेली मर्यादीत विभागीय परीक्षा पदोन्नतीसाठी होती. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयान्वये सरळ सेवेसाठी देण्यात आलेली कमाल वयोमर्यादेमधील शिथीलता सदरहू पदोन्नती परीक्षेसाठी लागू ठरत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक शहरातील द्वारका परिसरात टेम्पोने धडक दिल्याने ७ जणांचा झालेला मृत्यु**

**(२९)** * **१६५६ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील द्वारका परिसरात लोखंडी सळयांची वाहतूक करणाऱ्या ट्रेलरला माणसांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोने धडक दिल्याने ७ जणांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहरांतर्गत रस्त्यावर अवजड वाहतुक करण्याकरीता सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत निर्बंध घालण्यात आले असतांनाही सर्रास नागरी वस्तीतही भरधाव वेगाने अवजड वाहने चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अशा प्रकारचे अपघात रोखणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाई करण्यासह अपघातग्रस्तांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १२.०१.२०२५ रोजी झालेल्या अपघातात लोखंडी सळया भरलेल्या ट्रकला टेम्पो चालकाने ओव्हरटेक केल्याने एकूण ९ व्यक्तींचा मृत्यु झाला आहे व ११ व्यक्तींना गंभीर दुखापत झाली आहे.
(२) सदरचा अपघात हा मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग उड्डाण पुलावर द्वारकाजवळ, नाशिक येथे घडलेला आहे. तथापि नाशिक शहरांतर्गत रस्त्यावर अवजड वाहतूक करण्याकरीता निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर बाबतच्या वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अवजड वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभाग तसेच शहर वाहतूक शाखेकडून वेळोवेळी योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.
(३) सदर ट्रकमध्ये असुरक्षित लोखंडी सळया भरणारे व भरण्यास जबाबदार असणारी व्यक्ती विरुध्द गुन्हा नाशिक पोलीस आयुक्तालातील भद्रकाली पोलीस स्टेशन येथे गुन्हाची नोंद करण्यात आली असून गुन्हा रजि. नं.१२/२०२५ भा. न्या. संहिता २०२३ च्या कलमांन्वये तपास चालू आहे.
(४) अपघात रोखणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अवजड वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभाग तसेच शहर वाहतूक शाखेकडून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.

तसेच अपघात ग्रस्तांना वैद्यकीय मदतीसाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी येथे एका व्यक्तीचा न्यायालयीन कोठडीत झालेला मृत्यु**

**(३०) * ३७७ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयासमोरील संविधान पुस्तिकेच्या विटंबना प्रकरणी झालेल्या आंदोलनात व्हिडीओ रेकॉर्डींग करीत असलेल्या श्री.सोमनाथ सुर्यवंशी या व्यक्तीला अटक करुन त्याचा पोलीस कोठडीत मृत्यु झाल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मृत्यु प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करुन संबधितांविरुद्ध कारवाई करण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर घटनेनंतर झालेल्या तणावादरम्यान बाजारपेठेतील अनेक लहान-मोठ्या व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, उक्त नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाईचा सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी शासनाकडे सादर करुनही याबाबत अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्री. सोमनाथ सुर्यवंशी यांचा दि. १५/१२/२०२४ रोजी न्यायालयीन कोठडीत मृत्यु झाला आहे.

(२) होय.

(३) नुकसान झालेल्या लहान-मोठ्या व्यापाऱ्यांचे नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाईचा सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी, परभणी यांनी सादर केलेल्या दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजीच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.

(४) परभणी येथील हिंसाचार प्रकरणाची तसेच स्व.श्री.सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यु प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याकरिता सेवानिवृत्त न्यायाधीश मा.व्हि.एल.आचलिया यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रेहट्याखेडा (ता.चिखलदरा, जि.अमरावती) या गावातील**
**आदिवासी वृद्धास झालेली अमानुष मारहाण**

**(३१) * ३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेहट्याखेडा (ता.चिखलदरा, जि.अमरावती) या गावातील श्री.काळमी सेलुकर या ७७ वर्षीय आदिवासी वृध्दावर शेजाऱ्यांनी जादूटोणा केल्याचा आळ घेऊन त्यांना अमानुषपणे मारहाण करून अमानवी कृत्य केल्याची

घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात पोलीस पाटील यांचा सहभाग आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस पाटीलांना वाचविण्याचा स्थानिक पोलिस प्रयत्न करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांकडे तक्रार केली असता पोलीसांनी पीडीताच्या मुलास दुरध्वनीवरुन शिवीगाळ केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अटक करण्यात आलेले पाच आरोपी, पोलीस पाटील व स्थानिक पोलिस यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी चिखलदरा पोलीस स्टेशन येथे अप.क्र.०४/२०२५, कलम ११८(१), ११८(२), १९१(२), १२७(२), २३८, ३५२, ३५१, (२)(३), ३(५) भारतीय न्याय संहिता सहकलम ३(२) महाराष्ट्र जादुटोणा प्रतिबंध अधिनियम २०१३ अन्वये दि.०७.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर गुन्ह्यात एकूण पाच आरोपी आहेत त्यामध्ये पोलीस पाटील यांचा समावेश आहे. तसेच त्यांचेवर गुन्हा दाखल असून त्यांना अटक करण्यात आली आहे. तसेच त्यांचा कसूरी अहवाल महसूल विभागास सादर करण्यात आला असून, महसूल विभागाने त्यांना बडतर्फ केले आहे.
(४) सदर प्रकरणी चिखलदरा पोलीसांनी पिडीतेचे मुलास फोन केला होता. परंतु शिवीगाळ केल्याचे तपासाअंती निष्पन्न झालेले नाही. याबाबत पिडीतेचे व मुलाचे बयान घेण्यात आलेले आहे. त्या बयानात शिवीगाळ केल्याचे कथन केलेले नाही.
(५) सदर गुन्ह्यातील पाचही आरोपी अटक असून आरोपी सध्या जामीनावर आहेत. आरोपींवर बी.एन.एस. कलम १२५, १३५(३) अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्ह्याच्या प्राथमिक तपासात हलगर्जी केल्याप्रकरणी पोलीस निरीक्षक, २ पोलीस हवालदार व १ महिला पोलीस हवालदार यांना निलंबित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे कणदूर (ता.शिराळा, जि.सांगली) येथे खाजगी मालकी जागेवर अतिक्रमण करुन महावितरण कंपनीकडून विद्युत उपकेंद्राची उभारणी केली असल्याबाबत

**(३२)** * **१३७४ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कणदूर (ता. शिराळा, जि. सांगली) येथे सन २०१२ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांनी सदर गावातील “समस्त गावकरी” या खासगी मालकीच्या जागेत (सर्व्हे नंबर २१८/१) अतिक्रमण करून ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्राची उभारणी केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केंद्राची उभारणी करताना म.रा.व.वि.कं.मर्या. यांचे अधिकारी व ग्रामस्थांमध्ये चर्चा होवून ही जागा योग्य भाडे पट्टयाचा करार करून त्याचे भाडे देवून बांधकाम करणे व स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देणे असा ठराव ग्रामसभेमध्ये झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीने ग्रामपंचायत, ग्रामसेवक किंवा महसूल, बांधकाम विभाग यांची कोणतीही परवानगी न घेता तसेच रितसर जागा मागणी करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जागा त्यांचे नावे मंजूर करून न घेता तसेच ठरावानुसार जमिनीचा मोबदला अथवा भाडयापोटी एक रुपयाही न देता सदर जमिनीवर अतिक्रमण केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी कंपनीकडून प्रलंबित असलेली भाड्याची रक्कम व्याजासह मिळणे तसेच सध्याच्या रेडीरेकनरप्रमाणे जागेचा चारपट मोबदला तात्काळ मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्थानिकांच्या उक्त मागण्या मान्य करणे तसेच सदरहू कंपनी व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

मौजे कणदूर, ता.शिराळा,जि.सांगली येथील सर्व्हे नंबर २१८/१ येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. चे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र उभारणी ही ग्रामपंचायतीच्या दि.०२.१०.२००८ रोजीच्या ग्रामसभेतील ठराव क्र. ९(२) नुसार व दि. २७.०९.२०१० रोजीच्या ग्रामपंचायतीस सादर केलेल्या बांधकाम परवाना अर्जास अधिन राहून ८० आर जागेत पायाभूत  विकास आराखडा योजनेअंतर्गत केली आहे.

कणदूर ग्रामपंचायतीच्या दि.०२.१०.२००८ रोजीच्या ठराव क्र.९ (२) च्या मसुदयामध्ये सदर जागा भाडेपटयाने देणे व स्थानिकांना रोजगार देण्याबाबतचा उल्लेख असल्याचे आढळून येत नाही.
(३) हे खरे नाही.

कणदूर ग्रामपंचायतीच्या दि.०२.१०.२००८ रोजी पारित ठराव क्र. ९ (२) प्रमाणे, कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कोल्हापूर यांनी दि.३०.०३.२००९ रोजी जिल्हाधिकारी, सांगली यांना मागणी प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रस्तावाकरिता आवश्यक ना हरकत दाखले वन अधिकारी,सांगली, कार्यकारी अभियंता वारणा कालवे विभाग क्र.१ इत्यादी विभागांकडून उपलब्ध करुन महसूल विभागास सादर केले आहेत. तसेच कणदूर गावचे सरपंच व गावकरी, महसूल विभागामार्फत मंडळ अधिकारी शिराळा, तलाठी कणदूर आणि महावितरण कंपनीचे अधिकारी यांच्या समक्ष सदर जागेचा स्थळ पाहणी व पंचनामा दि.१०.१२.२००९ रोजी करण्यात आला होता. सदर पंचनाम्यानुसार विषयांकित जागा ही रिकामी पड व अतिक्रमण मुक्त असल्याचे व जागा ३३/११ के.व्ही. उपकेंद्रास मंजूरी देण्यास हरकत नाही असे नमूद केले आहे.

सदर विद्युत उपकेंद्र उभारणी हा सार्वजनिक व जनहितार्थ उपक्रम विहित मुदतीत करणे आवश्यक होता. यामुळे सदर पंचक्रोशीमध्ये व मौजे कणदूर नजिकच्या वाडया व वस्तीत विद्युत प्रणालीत सुधारणा योग्य व विनाखंड दाबाने वीज पुरवठा होणे शक्य होणार होते. तसेच त्यावेळी शासकीय निधी मंजूर व प्राप्त असल्याने पायाभूत  विकास आराखडा योजनेअंतर्गत सदर ३३/११ के.व्ही. उपकेंद्र दि.३१.०१.२०१३ रोजी कार्यान्वित झाले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भरणे-वेरळ (ता.खेड, जि.रत्नागिरी) या परिसरामध्ये एकाच मीटरवरून अनेक ग्राहकांना अवैध दिलेली वीजजोडणी

**(३३) * २९ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भरणे-वेरळ (ता.खेड, जि.रत्नागिरी) या परिसरामध्ये एकाच मीटरवरून अवैधरित्या अनेक ग्राहकांना वीजजोडणी देण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही खेड परिसरामध्ये सुमारे ३० लाख रुपयांची वीज चोरी प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असून अद्यापही त्या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड तालुक्यातील काही मोठे व्यावसायिक, विकासक आणि खाणींना देखील महावितरणाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने नियमबाहयरित्या वीज जोडणी देण्यात आल्यामुळे शासनाची मोठी आर्थिक फसवणूक सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ऊर्जामंत्री यांचेकडे दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे,

(२) हे अंशत: खरे आहे,

महावितरण कंपनीच्या भरारी पथक, पेण यांनी दि.२४.०४.२०२४ रोजी खेड परिसरात दोन संशयित औद्योगिक ग्राहकांच्या मीटरची तपासणी केली असता सदर ग्राहकाच्या मीटरमधून वीजेचा वापर हा चिरेखणसाठी होत असून, वीज चोरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर ठिकाणी P.T. screw loose करुन मीटरचा डिस्प्ले बंद करुन मीटरवर वीज वापराची नोंद होणार नाही अशी व्यवस्था करण्यात आली होती.

तसेच सदर ग्राहकांविरुध्द वीज कायदा २००३ (सुधारित २००७) कलम १३५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर दोन्ही ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे. सदर दोन्ही ग्राहकांनी त्यांना दिलेले निर्धारण रक्कमेचे देयक न भरल्यामुळे त्यांचेवर गुन्हयाची नोंद चिपळूण पोलीस स्टेशन येथे करण्यात आली आहे. तसेच दोन्ही ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आलेला असून, सदर प्रकरणामध्ये सखोल चौकशी करण्याचे आदेशित करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणामध्ये महावितरण कंपनीमार्फत सखोल चौकशी करण्याचे आदेशित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(३४) * ३३१ श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.शिवाजी कर्डिले (राहुरी), श्री.गोपिचंद पडळकर (जत), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.रोहित पवार (कर्जत**

**जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.करण देवतळे (वरोरा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.रवी राणा (बडनेरा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना दरमहा ७ तारखेपर्यंत वेतन न मिळणे, महागाई भत्याच्या फरकाची थकबाकी, वार्षिक वेतनवाढ फरक, घरभाडे भत्ता, सुधारीत महागाई भत्ता इ. लागू करणे, कोविड भत्ता, मेडिक्लेम कॅशलेस, शिस्त व आवेदन पद्धतीत बदल करणे, शासनाने राज्य परिवहन महामंडळाला स्वमालकीच्या बसेस देणे इ. राज्य परिवहन महामंडळाचे विविध प्रश्न प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांचे पीएफ आणि ग्रॅज्युएटीचे दोन स्वतंत्र ट्रस्ट असून ८९ हजार अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली भविष्य निधीची रक्कम गत १० महिन्यापासून ट्रस्टमध्ये जमा न केल्यामुळे अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पीएफचे ११०० कोटी आणि उपदानाचे १००० कोटी असे एकूण २१०० कोटी रुपये प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिणामी कर्मचाऱ्यांना हक्काची रक्कम काढण्यास अडचणी निर्माण होत असून उपरोक्त प्रलंबित अडचणींमुळे राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांची आर्थिक अडचण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसदर्भात वेळोवेळी लोकप्रतिनिधींनी, कर्मचारी व अधिकाऱ्यांनी, विविध संघटनांनी मा.परिवहन मंत्री महोदयांकडे निवेदन देऊनही अद्यापही याप्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांची सर्व थकीत देयके व मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) मा.औद्योगिक न्यायालयातील याचिकेत आदेशित केलेल्या नुसार रा.प. महामंडळाला वेतन प्रदान अधिनियम १९३६ लागू होत असल्यामुळे त्यामधील प्रावधान अन्वये दरमहा १० तारखेपर्यंत वेतन अदा करता येते असे त्यामध्ये नमूद आहे. त्यानुसार वेतन अदा करण्यात येते.

राज्य शासनाने गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवालानुसार महागाई भत्याच्या थकबाकीबाबत महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर सदर थकबाकीबाबत महामंडळाने निर्णय घेण्याचे समितीने निर्देश दिले आहेत, तदनुसार रा.प. महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर रा. प. महामंडळ स्तरावर योग्यतो निर्णय घेण्यात येईल.

रा.प. महामंडळाने २६४० स्वमालकीची नवीन तयार बसेस महामंडळाच्या वाहन ताफ्यात जमा करण्याचे ठरविले असून मार्च २०२५ पर्यंत प्राप्त होणाऱ्या ५०० वाहनांपैकी २०४ वाहने प्राप्त झालेली असून विभागांना वाटप करण्यात आलेली आहे.

(२) एसटी कर्मचाऱ्यांचे / अधिकाऱ्यांचे पीएफ आणि ग्रॅज्युएटीची रक्कम, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळास व उपदान निधी विश्वस्त मंडळास रु.२२१४.४७ कोटी अदा करणे बाकी आहे

(३) होय.

(४) व (५) प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने एसटी कर्मचा-यांच्या मागण्यांसदर्भात बैठका घेण्यात आलेल्या आहेत. बैठकींमध्ये तत्का. मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार दि.०१.०४.२०२० रोजीच्या मूळ वेतनामध्ये रु.६५००/- इतकी वाढ करून वेतन निश्चिती केलेली आहे. तसेच दि.०४.१०.२०२३ रोजीच्या गठीत करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालानुसार रा.प.म.ची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतन वाढीचा दर इ. च्या फरकाची रक्कम अदा करण्याबाबत रा. प. महामंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## राज्यात टोरेस हा ज्वेलरी ब्रँड चालविणाऱ्या प्लॅटिनम हर्न प्रा.लिमिटेड कंपनीने गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

**(३५) * ४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय देरकर (वणी), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, कल्याण या व अन्य भागात टोरेस हा ज्वेलरी ब्रँड चालविणाऱ्या प्लॅटिनम हर्न प्रा.लिमिटेड कंपनीने गुंतवणकीवर दर आठवडयाला १० टक्के परतावा देण्याचे प्रलोभन दाखवून सव्वा लाख गुंतवणूकदारांची सुमारे ३ हजार कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीद्वारे शहरात मोक्याच्या ठिकाणी सेमिनार्स घेवून 'टोरेस' नावाने शाखा उघडून ग्राहकांना सोने, चांदी आणि हिऱ्याचे दागिने देणाऱ्या कंपनीने हळूहळू पैशांत गुंतवणूक स्वीकारायला सुरुवात करुन, प्रामुख्याने चार प्रकारच्या योजनेद्वारे दर आठवड्याला जादा व्याजदर परतावा देण्याचे अमिष दाखविण्यात आल्याने काही गुंतवणूकदार हे एजंट म्हणून काम करु लागल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी कंपनीच्या सर्व शाखा दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी पूर्णत: बंद करुन अधिकारी पसार झाल्याचे ग्राहकांच्या लक्षात आल्याने पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीमुळे पोलिसांनी या प्रकरणात कंपनीच्या तीन वरीष्ठ पदाधिकाऱ्यांना अटक करुन त्यांची कसून चौकशी केली असता, त्यात काय निष्पन्न झाले आहे,
(४) असल्यास, कंपनीचे दोन संस्थापक युक्रेनला पळून गेल्याने त्यांच्याविरुद्ध लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागास टोरेस कार्यालयातील लॉकरमध्ये ५ ते ६ कोटी रोख रक्कम असल्याचे तर दादर कार्यालयातील ३ खात्यात ११ कोटी रुपये असल्याची माहिती प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन, कंपनीच्या सर्व संबंधित दोषींना अटक करुन कारवाई करण्यासह कंपनीची सर्व मालमत्ता जप्त करुन सर्व गुंतवणूकदारांची रक्कम परत मिळणेकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. अशंत: खरे आहे.

राज्यात विशेषत: मुंबई, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, कल्याण या भागात टोरेस हा ज्वेलरी ब्रँड चालविणाऱ्या प्लॅटीनम हर्न प्रा. लि. कंपनीने गुंतवणूकदारांना दर आठवडयाला मुंबई येथे ६ ते ११ टक्के, नवी मुंबई व मीरा-भाईंदर येथे २ ते ९ टक्के तर ठाणे येथे १० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखविल्याची बाब दि.०६.०१.२०२५ रोजी निर्दशनास आली. या प्रलोभनाला बळी पडून फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांची नोंद संख्या १५,६४६ असून त्यांची एकूण साधारणत: रु.१६३ कोटी इतक्या रकमेची आर्थिक फसवणूक झालेली असल्याचे आतापर्यंत निष्पन्न झाले आहे.

(२) होय. अशंत: खरे आहे.

सदर कंपनीने नवी मुंबई, मीरा-भाईंदर व ठाणे या ठिकाणी सेमिनार्स घेवून मोसेनाईट/ मोजोनाईट/ मोसेजेट खड्यांमध्ये/ज्वेलरीमध्ये गुंतवणूक केल्यास दर आठवड्याला २ ते ९ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखविले. या आमिषाला बळी पडून नवी मुंबई व ठाणे या भागात काही गुंतवणूकदारांनी स्वत:च्या मित्र व नातेवाइकांना साखळी पद्धतीने जोडले असल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे.

(३) होय. अशंत: खरे आहे.

गुंतवणुकदारांनी दि.३०.१२.२०२४ पासून आश्वासित परतावा न दिल्याने आणि त्याबाबतीत तक्रार दाखल केल्याने शिवाजी पार्क पोलीस स्टेशन, मुंबई, एपीएमसी पोलीस स्टेशन, नवी मुंबई, राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे आणि नवघर पोलीस स्टेशन, मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालय येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आतापर्यंत शिवाजी पार्क पोलीस स्टेशन, मुंबई येथे दाखल गुन्ह्याबाबत ७ आरोपींना, एपीएमसी पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे ३  आरोपींना तर नवघर पोलीस स्टेशन, मिरा-भाईंदर, वसई-विरार येथे ३ आरोपींना असे एकूण १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(४) होय. अंशत : खरे आहे.

एकुण ९ 'पाहिजे' आरोपींविरुध्द लुक आउट नोटीस जारी करण्यात आली आहे.

(५) होय. अशंत: खरे आहे.

अ) आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांना वेगवेगळया ठिकाणच्या झडतीमध्ये रोख रक्कम रु.६.७७ कोटी मिळाली असून आणि वेगवेगळया बँक खात्यातील रु.१८.४७ कोटी इतकी रक्कम गोठविण्यात आली आहे.

ब) नवी मुंबई येथील कंपनीच्या शोरुममधून रोख रक्कम, दागिने व इलेक्ट्रॉनिक्स वस्तू असे एकूण रु.१,८९,९०,७२३/- इतक्या किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

क) नवघर हद्दीतील कंपनीच्या शोरुममधून रोख रक्कम आणि कंपनीच्या दोन बँक खात्यातील मिळून रु.१०,६९,३०,५८०/- इतकी रक्कम गोठविण्यात आली आहे.

ड) ठाणे पोलीस आयुक्तालय हद्दीतील कंपनीमधून रोख रक्कम, सोने, हिरे व चांदीचे दागिने आणि तीन बँक खात्यातील मिळून एकूण रु.१५,२६,००,५२०/- इतकी रक्कम गोठविण्यात आली आहे.

(६) विविध ठिकाणी दाखल गुन्ह्यांमध्ये आतापर्यंत १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. इतर पाहिजे ९ आरोपितांचा शोध सुरु असून लुकआऊट नोटीस काढली आहे. गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्याकरीता टोरेस कंपनींच्या शोरूमची / कार्यालयाची तसेच अटक आरोपीतांची घरझडती घेवून, त्यामध्ये मिळून आलेली रोख रक्कम, मौल्यवान वस्तू व फर्निचर हस्तगत करण्यात आले आहेत.

-----------------

## राज्यातील विशेषत: ठाणे व पुणे जिल्ह्यात अल्पवयीन मुलींवर झालेले अत्याचार

**(३६) * ३३२ श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (जि.पुणे) येथील हॉटेलमधील एका वेटरने आठ व नऊ वर्षाच्या सख्या बहिणींवर बलात्कार करुन हत्या केल्याचा व मृतदेह दोन दिवस पाण्याच्या बॅरेलमध्ये लपवून ठेवल्याचा प्रकार दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी उघडकीस आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कल्याण (जि.ठाणे) येथील विशाल गवळी या इसमाने एका बारा वर्षीय मुलीचे अपहरण करुन व लैंगिक अत्याचार करुन हत्या केली असल्याची घटना माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी विशाल गवळी व अन्य पाच ते सहा गुन्हेगारांना विनयभंग, छेडछाड अशा गुन्ह्यात अटक केल्यानंतर, सदरहू गुन्हेगारांनी मानसिक रुग्ण असल्याचे प्रमाणपत्र मिळवून अशा गंभीर गुन्ह्यातून जामीन मिळविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दोन्ही प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर तसेच गुन्हेगारांना मानसिक रुग्ण असल्याचे प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी खेड पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.क्र.७०३/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७(२), १०३(१), ६४(२)(आय), ६५, ९६, १२७(२) सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ६, ८, १० अन्वये दि.२५.१२.२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून

आरोपी अटक आहेत. आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन कोळसेवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.११९०/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७(२) प्रमाणे नंतर कलम वाढ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४०(१), ६५(२), ६६, १०३, २३८ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ कलम ४ व ६ अन्वये दि.२४.१२.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी अटक असून सद्य:स्थितीत न्यायालयीन कोठडीमध्ये आहे.

(३) व (४) हे खरे नाही,

आरोपीने या पुर्वीच्या गुन्ह्यात मानसिक रुग्ण असल्याचे प्रमाणपत्र दाखवून जामीन मिळविल्याचे तपासामध्ये आढळून आलेले नाही.   तसेच सदर गुन्ह्यात आरोपीकडून मानसिक रुग्ण असल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. तसेच रुक्मीणीबाई रुग्णालय, कल्याण येथे पत्रव्यवहार केला असता संबंधितांकडून आरोपीस मानसिक रुग्ण असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.